# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

(Established by Government ofMaharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4Dated27th Sept. 2011 &
Presently a State University governed by Maharashtra Public University Act, 2016 (Maharashtra Act No. VI of 2017)

## National Service Scheme

Dr. Naresh M. Madavi
Director(I/c.)
Mo. No. - 8888282463

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: www.unigug.org
Email : nssdsw.gug@ gmail.com


पत्र क्र. No.GU/NSS/ 812 /2019 Dt: 13/08/2019

प्रति,

मा. प्राचार्य/रासेयो कार्यक्रम अधिकारी,
संलग्नीत सर्व रासेयो महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली.

**विषयः— दि. ०१ जुलै २०१९ ते दि. ३० सप्टेंबर २०१९ या कालावधीमध्ये ३३ कोटी वृक्षरोपण कार्यक्रमाच्या अंमलबजावणीबाबत.**

संदर्भः— १) पत्र क. रासेयो २०१८/२१०/साशि—७ दिनांक १२/१०/२०१८
व समक्रमांक पत्र क. दिनांक ११/०७/२०१९
२) शासन पत्र क्र संकीर्ण २०१९/सं.क्र ५०३/आस्था—२ दि.०२/०८/२०१९
३) प्रधान मुख्य वनरक्षक यांचे पत्र दिनांक २२/०७/२०१९
४) रासेयो —२०१९/पत्र क्र. ९१/साशि—७ दिनांक ०९/०८/२०१९

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भांकीत विषयान्वये ३३ कोटी वृक्षारोपण कार्यक्रम दि. ०१ जुलै २०१९ ते दि. ३० सप्टेंबर २०१९ या कालावधीमध्ये राबविण्याबाबत संदर्भ क १ अन्वये आपणांस सूचित करण्यात आले आहे.

उपरोक्त संदर्भ क २ अन्वये दिनांक ३०/०७/२०१९ रोजी संपन्न झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तानुसार आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश असून, तदनुसार कार्यवाही करण्यात यावी.

तथापि आपन वन विभागाशी संपर्क साधुन, त्यानुसार आपले उद्दिष्ट पूर्ण करण्याचा प्रयत्न करावा वन विभागाच्या www.mahaforest.gov.in या संकेतस्थळावरील दिसून येणारा प्रतिसाद वाढविणे आवश्यक असल्याचे तदनुषंगीक कार्यवाही करावी. तसेच आपनाकडुन कार्यवाही पूर्ण झाली असल्यास,परंतु वन विभागाच्या संकेतस्थळावर माहीती अपलोड केली नसल्यास, संकेतस्थळावर आपल्या माहीतीची नोंद करावी. तसेच पुढील तक्त्यात आपली माहिती रासेयो विभागास पाठवावी, ही विनंती

| अ. क्र | महाविद्यालयाचे नाव | वृक्षलागवडीची जागा | वृक्षलागवडीची संख्या | सहभागी रासेयो स्वंयसेवकांची संख्या |
|---|---|---|---|---|
| | | | | |

डॉ. नरेश मडावी
संचालक (प्र.)
राष्ट्रीय सेवा योजना
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

# महाराष्ट्र शासन

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,**
एलफिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर, 3 महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई-४०० ००१.
ई-मेल- nssmantralaya@gmail.com दूरध्वनी क्र. ०२२-२२६७९५६५.

क्रमांक: रासेयो-२०१९/प्र.क्र.९१/साशि-७ दिनांक: ०९.०८.२०१९.

**स्मरणपत्र-१**

प्रति,
कार्यक्रम समन्वयक तथा संचालक,
राष्ट्रीय सेवा योजना,
सर्व विद्यापीठे/संचालनालये

**विषय- दि. ०१ जुलै, २०१९ ते दि. ३० सप्टेंबर, २०१९ या कालावधीमध्ये ३३ कोटी वृक्षारोपण कार्यक्रमाच्या अंमलबजावणीबाबत.**

संदर्भ- १. या कार्यासनाचे पत्र क्र. रासेयो-२०१८/प्रक्र २१०/साशि ७, दि. १२.१०.२०१८ व समक्रमांक पत्र दि. ११.०७.२०१९
२.शासन पत्र क्र. संकीर्ण-२०१९/सं.क्र.५०३/आस्था-२ दि. ०२.०८.२०१९
३. प्रधान मुख्य वनसंरक्षक यांचे पत्र दि. २२.०७.२०१९

महोदय,

३३ कोटी वृक्षारोपण कार्यक्रम दि. ०१ जुलै, २०१९ ते दि. ३० सप्टेंबर, २०१९ या कालावधीमध्ये राबविण्याबाबत संदर्भ क्र. १ अन्वये आपणांस सूचित करण्यात आले आहे.

उपरोक्त संदर्भ क्र. २ अन्वये दि. ३०.०७.२०१९ रोजी संपन्न झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तानुसार आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश असून, तदनुसार कार्यवाही करण्यात यावी.

तथापि आपण वन विभागाशी संपर्क साधून, त्यानुसार आपले उद्दिष्ट पूर्ण करण्याचा प्रयत्न करावा. वन विभागाच्या www.mahaforest.gov.in या संकेतस्थळावरील दिसून येणारा प्रतिसाद वाढविणे आवश्यक असल्याने तदनुषंगीक कार्यवाही करावी. तसेच आपणाकडून कार्यवाही पूर्ण झाली असल्यास, परंतु वन विभागाच्या संकेतस्थळावर माहिती अपलोड केली नसल्यास, संकेतस्थळावर आपल्या माहितीची नोंद करावी. तसेच पुढील तक्त्यात आपली माहिती या कार्यासनास पाठविण्यात यावी. (विद्यापीठांनी आपली एकत्रित माहिती पाठवावी, स्वतंत्र महाविद्यालयांची माहिती अपेक्षित नाही.)

विद्यापीठाचे नाव:-

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नाव | वृक्षलागवडीची जागा | वृक्षलागवडीची संख्या | सहभागी रासेयो स्वयंसेवकांची संख्या |
|---|---|---|---|---|
| | | | | |

आपला

(मंगेश गोपाळ खैरनार)
सहायक लेखा अधिकारी, महाराष्ट्र शासन

सोबत- वरीलप्रमाणे

# महाराष्ट्र शासन

दूरध्वनी क्र.०२२-२२८५५७६६

क्र:संकीर्ण-२०१९/सं.क्र.५०३/आस्था-२
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
४३१ विस्तार, ४था मजला,मंत्रालय,
हुतात्मा राजगुरु चौक,मादाम कामा
रोड,मुंबई-४०० ०३२
दिनांक :०२ ऑगस्ट, २०१९

प्रति,

१) संचालक (उच्च शिक्षण/तंत्र), पुणे/मुंबई.
२) विशेष कार्यकारी अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना

**विषय :** ३३ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमाच्या अंमलबजावणीबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयांकित सोबत जोडलेले पत्र कृपया पहावे.

सदर पत्रात नमूद केल्याप्रमाणे आपल्या अधिपत्याखालील अधिकारी/कर्मचारी यांना आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत सूचना द्याव्यात, ही विनंती.

आपला,

सहपत्र: वरीलप्रमाणे.

(द. रा. कहार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

E:\New folder\५०३.docx

महाराष्ट्र शासन

तातडीचे

क्र. :- साववि-२०१८/प्र.क्र.१११/फ-११,
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक : ३१ जुलै २०१९.

प्रति,

सर्व प्रशासकीय विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव.

विषय :- प्रधान सचिव (वने) यांच्या अध्यक्षतेखाली सन २०१९ मधील दि. १ जुलै ते ३० सप्टेंबर २०१९ या कालावधीतील ३३ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमाच्या अंमलबजावणी संदर्भात झालेल्या आढावा बैठकीचे इतिवृत्त.

महोदय,

विषयांकीत प्रकरणी दि. ३० जुलै २०१९ रोजी, दुपारी ४ वा. प्रधान सचिव (वने) यांच्या अध्यक्षतेखाली सभागृह क्रं.३, नवीन मंत्रालय, ७ वा मजला येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीचे इतिवृत्त सोबत जोडले आहे. इतिवृत्तात नमूद केलेल्या बाबींवर कार्यवाही करण्याबाबत क्षेत्रीय अधिकाऱ्यांना कळविण्यासंदर्भात आपल्या प्रशासकीय विभागातील समन्वय अधिकाऱ्यांना सूचना द्याव्यात अशी विनंती आहे.

पुढील बैठक ऑगस्ट-२०१९ मध्ये शेवटच्या आठवडयात घेण्याचे नियोजित आहे. तरी वरीलप्रमाणे कार्यवाही संदर्भात आणि अनुपालन अहवाल पुढील बैठकीत सादर करण्याबाबत समन्वय अधिकाऱ्यांना सूचना द्याव्यात अशीही विनंती आहे.

(वीरेन्द्र तिवारी) ३१/०७/१९
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)

प्रत माहितीसाठी :-

१. विभागीय आयुक्त (सर्व)
२. जिल्हाधिकारी (सर्व)
३. मुख्य कार्यकारी अधिकारी (सर्व)
४. आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
५. सर्व प्रशासकीय विभागांचे प्रादेशिक प्रमुख / विभाग प्रमुख.

प्रत माहितीसाठी :-

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, पुणे.

विषय : मा. प्रधान सचिव (वने) यांच्या अध्यक्षतेखाली सन २०१९ मधील दि १ जुलै ते ३० सप्टेंबर २०१९ या कालावधीतील ३३ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमाच्या अंमलबजावणी संदर्भात दि. ३० जुलै २०१९ रोजी झालेल्या समन्वय अधिकाऱ्यांच्या बैठकीचे इतिवृत्त.

विषयांकीत प्रकरणी आयोजित केलेल्या बैठकीसाठी उपस्थित अधिकाऱ्यांची यादी सोबत जोडली आहे. सदर बैठकीमध्ये खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.

| अ. क्र. | विषय | निर्णय | अंमलबजावणीशी संबंधित अधिकारी | कालमर्यादा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | वृक्ष लागवडीचे प्रशाकीय विभाग व यंत्रणा निहाय जिल्हा व प्रादेशिक स्तरावरील उद्दिष्ट व साध्य याची टक्केवारी आणि सर्व विभागांची माहिती दररोज वन विभागाच्या संकेतस्थळावर भरणे. | १. बऱ्याचशा प्रशासकीय विभागांची, यंत्रणांची दिलेल्या उद्दिष्टानुसार वृक्ष लागवडीचे साध्य शून्य किंवा अपेक्षेपेक्षा खूप कमी आहे. सर्व समन्वय अधिकाऱ्यांनी दररोज किमान अर्धा तास वन विभागाच्या संकेतस्थळावरील ३३ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमासंदर्भातील ऑनलाईन जिल्हा व तालुकास्तरावरील माहितीचे अवलोकन करावे. ज्या प्रशासकीय विभागांची जिल्हानिहाय कामगिरी कमी असेल त्यांच्याशी संबधित क्षेत्रिय अधिकारी व यंत्रणांना वृक्ष लागवडीचा वेग वाढविण्याबाबत तात्काळ कळविण्यात यावे.<br>२. जवळपास ७५ टक्के वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट दि.१५ ऑगस्ट, २०१९ पर्यंत साध्य करावयाचे असल्याने याबाबत पत्र पाठविण्यात कालपव्यय न करता संबंधित क्षेत्रिय अधिकारी / यंत्रणेस थेट दुरध्वनीवरून संपर्क साधावा.<br>३. त्याचप्रमाणे ज्या जिल्ह्यातील वृक्षारोपणाचे काम मागे आहे, त्या संदर्भातील माहिती समन्वय अधिकाऱ्यांनी आपल्या प्रशासकीय विभागांचे मा. अपर मुख्य सचिव/ मा. प्रधान सचिव / मा. सचिव यांना देण्यात यावी. त्यांच्या मार्फत देखील संबंधित क्षेत्रिय अधिकारी /यंत्रणा यांना वृक्षारोपणाचा वेग वाढविण्याबाबत कळविण्यात यावे. समन्वय अधिकारी यांनी याबाबत सनियंत्रण करावे.<br>४. यापूर्वी वेळोवेळी दिलेल्या सूचनांप्रमाणे विविध प्रशासकीय विभाग व यंत्रणा यांनी वृक्ष लागवडीचे ७५ टक्के उद्दिष्ट दि. १५ ऑगस्ट २०१९ पर्यंत पूर्ण करण्याबाबत कसोशीने प्रयत्न व्हावेत. जेणेकरुन, झाडांना अधिक काळ पावसाचे पाणी मिळून वृक्ष जिवंत राहण्याचे प्रमाण उत्तम राखले जाईल.<br>५. सर्व प्रशासकीय विभागांच्या क्षेत्रीय यंत्रणांनी जसजशी वृक्ष लागवड होईल, त्यानुसार माहिती तात्काळ वन विभागाच्या संकेतस्थळावर भरावी. केवळ वृक्ष लागवडीचे फोटो न टाकता वृक्षारोपणापूर्वीची वृक्षारोपण स्थळे, तयार खड्डे आणि वृक्षारोपण अशा तीनही घटकांचे अक्षांश-रेखांशासह अत्यंत स्पष्ट फोटो व व्हीडीओ क्लिप्स अपलोड करण्याबाबत कटाक्षाने काळजी घ्यावी.<br>६. त्याचप्रमाणे यापूर्वीच्या २ कोटी, ४ कोटी, १३ कोटी वृक्ष लागवडीची दि. ३१ मे आणि ३१ ऑक्टोंबर असे वर्षातून दोन वेळा आणि नियोजित ३३ कोटी वृक्षारोपण अशीच माहिती अक्षांश- | सर्व प्रशासकीय विभागांचे समन्वय अधिकारी आणि सर्व प्रशासकीय विभागांतर्गत प्रादेशिक प्रमुख / विभाग प्रमुख . | त्वरीत कार्यवाही. |

Office of Principal Chief Conservator of Forests (Head of Forest Force)

Principal Chief Conservator of Forests (Budget, Planning & Development) Maharashtra

Off. : 'Van Bhavan', Ramgiri Road, Civil Lines, Nagpur-440 001
Phone +91-712-255 6785 Fax +91-712-2550675 Mob. +91-9422045386
pccfbpd@mahaforest.gov.in sai_prakash86@yahoo.com

सत्यमेव जयते
Government of Maharashtra

**G. Saiprakash** IFS

**ई-मेलव्दारे**

**क्रमांक** : कक्ष-१/रोहयो/प्रक्र.२०/६६८/१९-२०
**नागपूर-४४० ००१,** दिनांक- २२/०७/२०१९

प्रति,

**सचिव ,**
**उच्च शिक्षण विभाग,**
**मंत्रालय, मुंबई.**

सचिव
उच्च व तंत्र शिक्षण
यांचे कार्यालय
क्र. Gen. 358
दि. 3/8/19

**विषय** :- ३३ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमाच्या अंमलबजावणी संदर्भात..

**संदर्भ** :- १) शासन पत्र क्र.साववि-२०१८/प्र.क्र.१११/फ-११, दि.२०/०७/२०१९

२) या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-१/रोहयो/प्र.क्र.२०/४४७, दि.२४/०६/२०१९

विषयांकीत प्रकरणी सन २०१९ मधील पावसाळयात ३३ कोटी वृक्ष लागवडीचे अनुषंगाने वाटप करण्यात आलेले उद्दीष्टे साध्य करण्याकरीता १ जुलै /२०१९ ते ३० सप्टेंबर/२०१९ या कालावधीत शासनाने वनविभाग तसेच इतर यंत्रणा यांचा सहभाग घेऊन वृक्ष लागवड करणेबाबतचा उपक्रम हाती घेण्यात आलेला आहे. सदयस्थितीत सदर उपक्रमास मोठया प्रमाणात प्रतिसाद मिळत असून महाराष्ट्रातील सर्व प्रशासकीय विभागाव्दारे मोठया प्रमाणावर वृक्ष लागवड सुरु आहे. तसेच वनविभागाच्या महाफॉरेस्ट वेबसाईट वर अपलोड करण्यात आलेल्या माहितीचा आढावा घेतला असता, आज दि.२२/०७/२०१९ रोजी महाराष्ट्रात खालीलप्रमाणे वन व वनेत्तर योजनेंतर्गत खालीलप्रमाणे वृक्ष लागवड झाल्याचे दिसून येते.

| एकुण वन विभागाचे उद्दीष्टे | रोपे लागवड संख्या | एकुण वनेत्तर विभागाचे उद्दीष्टे | रोपे लागवड संख्या |
|---|---|---|---|
| १८,७९,०४,०७० | ९,२९,२४,९८४ | १५,७०,९०,६५० | ३,४०,८२,५८६ |

उपरोक्त माहितीवरुन आपण सर्वांनी ३३ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमात हिरहिरीने सहभाग दाखविला त्याबद्दल आपले आभार व्यक्त करतो. तथापी, आपणास कळविण्यात येते की, आपले विभागाची सखोल तपासणी केली असता, काही ठिकाणी अपेक्षेपेक्षा कमी प्रमाणात प्रगती झालेली दिसून येते. करीता आपलेस्तरावरुन अधिनस्त अधिकारी यांचेकडुन रोपवनाचा आढावा घेऊन त्यांना ३३ कोटी वृक्ष लागवड अंतर्गत वाटप करण्यात आलेल्या उद्दीष्टांची पूर्तता करणेकरीता पुरेपुर प्रयत्न करणेबाबत सुचीत करण्यात यावेत. जेणेकरुन ३३ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमाचे अनुषंगाने महाराष्ट्राची उल्लेखनिय कामगिरी म्हणून नोंद करण्यात येईल.

DS/K

आपला,

( जी. साईप्रकाश )
**प्रधान मुख्य वनसंरक्षक**
**( अर्थसंकल्प, नियोजन व विकास )**
**महाराष्ट्र राज्य.**